

## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# बंगळुरूत गैरनियोजनाचे बळी!

आयपीएल विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या जल्लोषाला गालबोट लागले आहे. विजेत्या संघाची व्हिक्टरी परेड पाहण्यासाठी झालेल्या तुफान गर्दीमुळे चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेटवर मोठी चेंगराचेंगरी झाली. यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला. तर या चेंगराचेंगरीत ५० पेक्षा जास्त चाहते जखमी झाले आहेत. खरेतर, तब्बल १८ वर्षांनी आरसीबीने मिळवलेल्या विजयामुळे कर्नाटकसह विराटच्या चाहत्यांचा उत्साह प्रचंड आहे. त्यामुळेच बंगळुरूत अनेक चाहते चिन्नास्वामी स्टेडियमवर क्रिकेटपटूंची एक झलक पाहण्यासाठी जमा होतील याचा सर्वांनाच अंदाज होता. खुद्द विराट कोहलीने देखील त्याच्या उपस्थितीत गर्दीचा अंदाज लावला होता. परंतु प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केलेले दिसते. अशा प्रसंगी स्टेडियममध्ये स्थानिक प्रशासन आणि आयोजकांनी मिळून एक ठोस गर्दी नियंत्रण आराखडा तयार केला असता, तर ही दुर्घटना टळू शकली असती. प्रत्यक्षात काय घडले, तर उत्स्फूर्त गर्दीच्या ओघात कोणताही स्पष्ट मार्गदर्शन करणारा व्यवस्थापनाचा प्रतिनिधी नव्हता. ना पुरेशी सुरक्षा यंत्रणा होती, ना गर्दीला नियंत्रित करण्यासाठी कोणत्याही भौतिक अडथळ्यांची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे चाहत्यांनी स्टेडियमच्या प्रवेशद्वाराकडे धाव घेतली आणि त्यातच शेकडो जण एकमेकांवर कोसळले. दुसरी गंभीर चूक म्हणजे माहितीचा अभाव. अनेक जणांना समारंभाचं स्थान, वेळ, प्रवेशाची अट आणि आवश्यक परवाने यांची काहीच कल्पना नव्हती. सोशल मीडियावर पसरलेल्या अफवांमुळे आणि 'पहिला विजय सोहळा' पाहण्याच्या आतुरतेमुळे लोक हजारोंच्या संख्येने एकाचवेळी स्टेडियमच्या दिशेने निघाले. जर यापूर्वीच अधिकृत सूत्रांमार्फत स्पष्ट आणि वेळेवर माहिती दिली गेली असती, तर गर्दी नियंत्रित करता आली असती. याउलट, आयोजक आणि स्थानिक प्रशासनाने संवाद साधण्यात ढिसाळपणा दाखवला. यामुळे तिथे उपस्थित लोकांमध्ये संभ्रम आणि गोंधळ निर्माण झाला, जो पुढे जीवघेणा ठरला. तिसरी बाब म्हणजे अशा प्रकारच्या मोठ्या सार्वजनिक समारंभांमध्ये कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ कृती करणारी यंत्रणा असावी लागते. परंतु या दुर्घटनेत ज्या प्रमाणात उशीर झाला, त्यावरून प्रशासनाची ढिलाई स्पष्टपणे दिसते. जखमींना रुग्णालयात पोहोचवण्याची गती, घटनास्थळी पहिल्या मदतीची उपलब्धता आणि एकंदर समन्वय यामध्ये मोठी विसंगती पाहायला मिळाली. अपघात घडल्यानंतर तासभर उलटूनही काही भागात मदतीसाठी कोणीच पोहोचले नव्हते, असे अनेक प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. यामुळे मृतांचा आकडा वाढला. या दुर्घटनेत तात्पुरत्या सोयींसाठी केलेल्या समारंभाच्या जागेची निवडही विचारात घेण्यासारखी आहे. स्टेडियमचा परिसर आधीच वाहतुकीच्या दृष्टीने गर्दीचा आणि अडचणीचा आहे. त्यातच एकाच वेळेस हजारो लोक जमल्याने परिसरात मोठा गोंधळ झाला. जवळपासच्या रस्त्यांवर वाहतूक ठप्प झाली आणि आपत्कालीन सेवा तिथपर्यंत पोहोचण्यास अपयशी ठरल्या. जर समारंभासाठी अधिक मोकळ्या जागेची निवड करण्यात आली असती किंवा प्रवेश आणि निर्गमन यासाठी स्वतंत्र मार्ग निश्चित केले गेले असते, तर लोकांची चेंगराचेंगरी टाळता आली असती. ही बाब आयोजकांच्या जागा निवडण्याच्या निर्णय क्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करते. या घटनेने एक गोष्ट स्पष्ट केली आहे ती म्हणजे, बीसीसीआय आणि संबंधित संघांनी विजयाच्या उत्सवात सुसंगतता आणि जबाबदारीची भूमिका स्वीकारली पाहिजे. सध्या बीसीसीआयच्या नियंत्रणाखाली फ्रँचायझींच्या विजयी रॅलीवर कोणतीही ठोस आणि पारदर्शक धोरण नाही. बीसीसीआयने आता वेळेवर एक ठोस धोरण तयार करणे गरजेचे आहे. सर्व आयपीएल फ्रँचायझींना विजयी रॅली आयोजित करण्यापूर्वी बीसीसीआयकडून परवानगी घ्यावी लागेल आणि त्यांच्या रॅलीची संपूर्ण योजना आधी सादर केली जावी. यामुळे रॅली आणि जल्लोष सुसंगत आणि सुरक्षित पद्धतीने पार पडतील. यामध्ये प्रशासनाची भूमिकादेखील अत्यंत महत्त्वाची आहे. राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासन यांचा सहभाग खूप आवश्यक आहे. कारण, सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन हे केवळ आयोजकांचेच काम नाही, तर त्याचे परिणाम सुसंगत आणि सुरक्षित ठेवण्यासाठी स्थानिक प्रशासनाच्या मदतीची आवश्यकता असते. बीसीसीआयला या दृष्टिकोनातून अधिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. लोकांच्या जीवाची सुरक्षा आणि काळजी घेणे हे सगळ्यांचे प्राधान्य असायला हवे. तोपर्यंत, सार्वजनिक रॅलींना राज्याच्या कडक नियंत्रणाखाली ठेवून त्याचे नियोजन योग्य प्रकारे केले जावे. नवीन नियम व धोरण तयार करणे अत्यंत आवश्यक आहे, जे आयोजक, प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणेला एक ठोस मार्गदर्शन देतील. यामुळे भविष्यात कोणत्याही प्रकारची दुर्घटना टाळता येईल आणि उत्सव सुरक्षित, सुव्यवस्थित आणि नियंत्रित पद्धतीने साजरे होऊ शकतील. बीसीसीआयने या मुद्द्यावर त्वरित कृती केली पाहिजे, अन्यथा भविष्यात अशी घटना पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकूणच, ही दुर्घटना केवळ नियोजनातील त्रुटींचा परिणाम नाही, तर आपल्या सार्वजनिक कार्यक्रमांच्या आयोजनातील दृष्टिकोनाचे अपयश आहे. आपण आजही अशा घटना 'अपघात' म्हणून गृहीत धरतो आणि त्यावर कोणतंही गंभीर चिंतन करत नाही, हेच या प्रकारांच्या पुनरावृत्तीचे मूळ कारण आहे. जेथे सार्वजनिक सुरक्षिततेपेक्षा जल्लोषाला प्राधान्य दिले जाते, तेथे अशा दुर्दैवी घटना घडतच राहणार. त्यामुळे या दुर्घटनेनंतर केवळ चौकशी समित्या स्थापन करून उपयोग नाही तर सार्वजनिक कार्यक्रमांबाबत आपला संपूर्ण दृष्टिकोन, नियोजन पद्धती आणि जबाबदारी स्वीकारण्याची वृत्ती यामध्ये मूलगामी बदल करणे आवश्यक आहे.

# २ ठाकरे, २ पवार आणि मध्येच काँग्रेस

**राजकारणात ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याची आणि पवार कुटुंबातील संबंध सुधारण्याची चर्चा सुरू आहे. काँग्रेस महाविकास आघाडीत राहून स्वतंत्रपणे मुंबई महापालिका लढण्याचा विचार करते आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यास काँग्रेसला युतीत अडचण होऊ शकते. व्यवहारवादी राजकारण, सत्ता, जागावाटप आणि पक्षांचे स्वतंत्र अस्तित्व यांसारख्या मुद्द्यांवर सर्व पक्षांची भूमिका ठरवणे गरजेचे आहे. काँग्रेस, शिवसेना आणि मनसे यांच्यातील समीकरणं गुंतागुंतीची झाली आहेत.**



एका बाजूला उद्धव आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र येणार का, शिवसेना आणि मनसे मुंबई महानगरपालिका निवडणुकीत एकत्र आलेले दिसणार का याची चर्चा सुरू असतानाच शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पुतणे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत जाणार का यावर चर्वितचर्वण घडत आहे. तिकडे काँग्रेस महाविकास आघाडीतून बाहेर न पडता स्वतंत्रपणे निवडणूक लढवू शकतो का, यावर चर्चा करत आहे.

राज्यापुढचे सारे महत्त्वाचे प्रश्न जणू विरोधकांची एकी होणार का, यापुढे गौण ठरू लागले आहेत. पुण्यात शरद पवार आणि अजित पवार साखर संकुल, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथे भेटले की बातम्या सुरू होतात. इकडे ठाकरे परिवारापैकी कोणी मंद स्मित केले तरी त्यावर चर्चा सुरू होते अन मध्येच कोणी सैनिक ठाकरे बंधूनी एकत्र यावे याबाबत आशावाद व्यक्त करतो. ते एकत्र येण्याची चर्चा सुरू होताच काँग्रेस कान टवकारते आणि आपण काय भूमिका घ्यावी यावर दिल्लीकडे कटाक्ष टाकते, असे सुरू आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ अलीकडेच मातोश्रीवर जाऊन आले. प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर बरेच दिवस ते मातोश्रीकडे फिरकत नव्हते तेव्हा दिल्लीहून काही सूचना असाव्यात असे वाटत होते. ते भेटले तेव्हा काँग्रेस नेते शिवसेनेपासून दूर राहू इच्छित नाहीत, हे स्पष्ट झाले. आता तर या पक्षाचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले आहेत की, काँग्रेस महाविकास आघाडीसोबत राहू इच्छिते. त्याचवेळी काँग्रेस याचीही चाचपणी करतेय की आपण मविआच्या बाहेर न पडता स्वतंत्रपणे मुंबई महापालिका लढू. म्हणजे यात दोन हेतू आहेत.

एक - स्वतंत्रपणे लढल्यास अनेक कार्यकर्त्यांना उमेदवार म्हणून संधी मिळते आणि स्थानिक नेत्यांची स्वतःची मतपेढी यावेळी कामाला येते. जे आपापल्या वार्डात प्रभावी ठरतील ते निवडून येतील. दोन - सत्तेसाठी गरज भासलीच तर मविआचा घटक म्हणून शिवसेनेसोबत सत्तेत बसायला अडचण येणार नाही. पण दोन्ही ठाकरे एकत्र आलेच तर मात्र काँग्रेस त्यांच्या सोबत युती करायला बिचकत आहे. याचे कारण जागा वाटपात फारसे काही हाती लागणार नाहीच, शिवाय बिहारच्या निवडणुकीत मुंबईतल्या शिवसेना-मनसेसोबत गेल्याचे काय पडसाद उमटतात व त्याचे इतर पक्ष काय भांडवल करतात याचाही विचार होत असेल.

बिहारमध्ये काँग्रेस राष्ट्रीय जनता दलासोबत युती करणार. पण त्याचवेळी मुंबईत शिवसेना-मनसेसोबत राहिल्यास लालूप्रसाद यादव आणि त्यांचे चिरंजीव तेजस्वी बहुदा ते पसंत करणार नाहीत. हे झाले दूरचे. पण मुंबई काँग्रेसमध्ये तर घरचे झाले थोडे अन व्याह्याने धाडले घोडे अशी काँग्रेसची अवस्था झाली आहे. मुंबई काँग्रेसमध्ये अनेक नेत्यांची तोंडे अनेक दिशांना आहेत. असो.

ठाकरे बंधूंनी एकत्र यावे अशी अनेक शिवसैनिकांची इच्छा दिसते. राजकारणात आता तत्त्वापेक्षा व्यवहाराला महत्त्व आले आहे. ठाकरेंच्या सैनिकांना आपल्याला सत्ता कधी मिळेल याची चिंता सतावू लागली आहे. आताच्या राजकारणात केवळ तात्त्विकतेवर पोट भरत नाही. राजकारणाची गाडी सुसाट पळविण्यासाठी इंधन लागते. त्यासाठी सत्ता लागते. कारण पदरमोड करून राजकारण किती काळ करणार हा प्रश्न असतो. त्यासाठी दोन्ही ठाकरे एकत्र आले तर जिवंत राहू, अन्यथा आहे तिथेच संपून जावे लागेल, असा विचार दोन्ही सेनेच्या सैनिकांमध्ये येत असेल तो चुकीचा आहे, असे म्हणता येत नाही.

केवळ दोन ठाकरे एकत्र येऊन प्रश्न सुटत नाही. दोन पक्ष - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची ही युती असेल. ती करताना दोन्ही पक्षांचे अस्तित्व कायम ठेवून ती होईल. जागावाटप हा ही कळीचा मुद्दा असेल. याही पेक्षा काय महत्त्वाचे असेल तर दोन्ही पक्षांच्या विविध विषयांवरील भूमिका एकामेकांना मान्य व्हायला हव्यात आणि सत्ता मिळाली, तर निर्णयप्रक्रियेत दोघांनाही तुल्यबळ स्थान हवे असणारच. २०१७ साली शिवसेनेने चुरशीच्या लढतीत भाजपाला बाजूला ठेवून सत्ता मिळवली खरी. पण मनसेचे नगरसेवक फोडल्यामुळे काहीशी कटुता निर्माण झाली होती. मनसेचे स्वतंत्र अस्तित्व शिवसेनेला मान्य करावे लागेल आणि भविष्यात अशा गोष्टींपासून दूर रहावे लागेल, हे मान्य झाले, तर कदाचित राज ठाकरे टाळी देतील, असा रागरंग आहे.

दोन ठाकरे एकत्र येऊ नये, अशीच महायुतीची इच्छा असणार यात शंका नाही. एकनाथ शिंदे यांचे काही विश्वासू लोक शिवतीर्थवर जात आहेत ते यासाठीच. दोन ठाकरे एकत्र आल्यानंतर मुंबईतली ठाकरे व्होटबँक स्वतंत्र अस्तित्व दाखवणारच. तिथे शिंदेंच्या सेनेची डाळ बहुदा शिजणार नाही. म्हणून काहीतरी घडामोडी होणारच होणार.

राष्ट्रवादी काँग्रेस हा राजकीयदृष्ट्या अत्यंत व्यवहारवादी लोकांचा पक्ष आहे. काँग्रेसमध्ये आपली कुचंबणा होतेय हे लक्षात आल्यावर शरद पवार यांनी बाहेर पडत हा पक्ष स्थापन केला आणि पहिल्याच निवडणुकीत आपल्या समर्थकांना सत्तेत स्थान दिले. ते एकत्रित काँग्रेसमध्ये असताना शक्य नव्हते. सहकार, सिंचन, शेतमाल विक्री व्यवस्थापन यात पारंगत असलेल्या लोकांचा पक्ष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. या तिन्ही विषयांत या पक्षाचे लोक राजकारण करत आपापले सवते सुभे सांभाळण्याचा अटोकाट प्रयत्न करतात.

राजकीय तत्त्वज्ञानापेक्षा आपले समर्थक सोबत राहिले, ते निवडून आले तर आपले राजकारण टिकेल या हिशेबाने पवारांनी उक्ती आणि कृती यात चाणाक्षपणे अतंर राखत राजकारण केले. त्यांच्यापासून लोक दूर गेले तरी ते त्यांच्या राजकीय गरजांपोटी जातात आणि जेव्हा राजकारण बदलते तेव्हा ते सहजच एकत्र येतात. त्यांच्या राजकारणात भावनिकतेला स्थान नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्यात फरक आहे हे हाच. पण शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार अशा बातम्या सुरू झाल्या की शिवसेनेचे काही नेते बेफाट प्रतिक्रिया देऊन मोकळे होतात.

पवारांचे राजकारण त्यांना समजत नाही, अशातला भाग नाही. पण मग बेफाट बोलून काय साध्य होते आणि त्यात सेनेचे काय भले होते, ते त्यांनाच ठाऊक. प्रतिस्पर्ध्यांच्या हालचालींचा चाणाक्षपणे वेध घेत असताना जिथे समोरचा चुकला तिथे डाव साधला, ही पवारांच्या राजकारणाची निती राहिलेली आहे. आता कन्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष काम करतो आहे. त्यांना व इतर सहकाऱ्यांना राजकारणात टिकून राहण्यासाठी जे-जे करता येईल ते पवार करत असतात. म्हणूनच त्यांनी आपण पक्षाच्या राजकीय निर्णयप्रक्रियेत नसल्याची सूचक विधाने केली आहेत. हे पटत नसेल तर शिवसेनेने ते लोकांसमोर तेवढ्याच चाणाक्षपणे आणत सध्याची जनभावना पाहता आपला काही फायदा होईल का, हे पाहिले पाहिजे. पण या पक्षात विचारप्रक्रिया, राजकीय व्यूहरचना यापेक्षा 'आवाज कुणाचा' यावरच भर असतो. या घोषणेला प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या वरचेवर घटत असताना, रोज एकेकजण शिंदेंच्या सेनेत जात असताना काही वेगळा विचार झाला तर ठीक; अन्यथा पुढचा काळ आणखीच आव्हानात्मक असणार आहे.

# हेलकाव्यांची गोळाबेरीज

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीबाबत एकीकडे गेल्या तिमाहीतील विकासदराच्या उसळीमुळे व्यक्त होणारी आशा; तर दुसरीकडे दिसून येणारा गेल्या चार वर्षांतील नीचांक, असे परस्परविरोधी चित्र पाहून हत्ती आणि चार आंधळ्यांची गोष्ट आठवल्यावाचून राहत नाही. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीवरून या विकासदराची आपापल्या सोयीनुसार तुलना करून प्रत्येकाला हवा तो अर्थ काढण्याचे स्वातंत्र्य नक्कीच आहे; मात्र प्रश्न आहे, तो या टोकाच्या दाव्यांच्या मध्ये लपलेले वास्तव शोधून भविष्यातील दिशा ठरवण्याचा. अनुक्रमे ६.५, ५.६ आणि ६.४ असे गेल्या आर्थिक वर्षातील चार तिमाहींचे निकाल पाहता अंतिम तिमाहीतील ७.४ टक्के विकासदर हा या वर्षातील सर्वाधिक आहे; परंतु करोनानंतरच्या गेल्या चार वर्षांशी तुलना करता तो नीचांकी ठरतो. सरत्या आर्थिक वर्षातील शेवटच्या तिमाहीतील वाढीने वार्षिक विकासदर साडेसहा टक्क्यांवर राहण्यावर मात्र सर्वांचेच एकमत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेने चार लाख कोटी डॉलरचा टप्पा ओलांडल्याची चर्चा असली, तरी प्रत्यक्षात तो अजून ३.९ लाख कोटी डॉलरवर आहे. तथापि, ही गती कायम राखल्यास जपानला मागे टाकून जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचे लक्ष्य भारताला गाठता येईल. शेवटच्या तिमाहीमध्ये देशातील खासगी क्षेत्रातील वाढलेला वस्तूवापर, बांधकाम आणि उत्पादन क्षेत्रांनी नोंदविलेली वाढ आणि कृषी उत्पादन क्षेत्राची उंचावलेली कामगिरी यांचे या वाढलेल्या विकासदरात योगदान आहे. पाच वर्षांपूर्वी आलेल्या करोनाच्या साथीने साऱ्या जगाचे अर्थकारण विस्कळित केले. नंतर एकीकडे रशिया-युक्रेन आणि दुसरीकडे गाझापट्टीतील युद्धजन्य स्थिती आणि विस्कटलेली पुरवठा साखळी या समस्यांची भर पडली. अमेरिकेसह अनेक देशांनी या काळात उघडलेल्या तिजोरीमुळे चलनवाढीनेही अर्थव्यवस्थांना ग्रासले. त्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया तुलनेने पक्का राहिला. या काळात आपल्याकडे विशेषतः सरकारने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात केलेली मोठी गुंतवणूक, वाढलेली देशांतर्गत मागणी, करसुधारणा, डिजिटल व्यवहारांचे सार्वत्रिकीकरण आणि कृषी-सेवा अशा क्षेत्रांमध्ये नोंदविण्यात आलेल्या चांगल्या कामगिरीच्या आधारावर भारताची अर्थव्यवस्था टिकून आहे. गेल्या काही वर्षांत देशात नवमध्यमवर्गाने केलेल्या खर्चामुळे सकल उत्पन्नात भर पडत आहे. त्याआधारे सत्ताधारी वर्गाकडून अर्थव्यवस्थेचे गुलाबी चित्र रंगविण्यात येते; मात्र या आकड्यांचा सरकारला अनुकूल अर्थ काढला, तरी सुदृढ अर्थव्यवस्थेच्या मार्गात अजूनही बरीच आव्हाने आहेत, यात शंका नाही. काही दिवसांपूर्वीच निती आयोगाने जाहीर केल्यानुसार भारताच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान नक्कीच वाढले आहे; मात्र अंतर्गत आणि जागतिक परिस्थितीतील अनेक आव्हाने समोर उभी आहेत. अमेरिकेने जाहीर केलेल्या व्यापारयुद्धानंतर सगळेच देश आर्थिक आघाडीवर संरक्षणवादी धोरणांचा अवलंब करू लागले आहेत. सध्याची स्थिती ही अर्थव्यवस्थेला आलेली सुस्ती असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येते. देशातील संपत्तीचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाले असून, अजूनही देशातील मोठा वर्ग पुरेसा खर्च करू शकत नाही; तसेच, सध्याचा विकासदर प्रामुख्याने शहरी मागणीवर आधारलेला आहे, हे वास्तव आहे. महागाई कागदोपत्री नियंत्रणात भासली, तरी उत्पन्न आणि महागाईचा मेळ बसत नसल्याने बहुसंख्य नागरिक हात राखूनच खर्च करताना आढळतात. त्यामुळे देशांतर्गत मागणी वाढविण्यासाठी सर्व स्तरांमधील नागरिकांच्या क्रयशक्तीला बळ द्यावे लागणार आहे. विशेषतः लोकसंख्येतील मोठा घटक असलेल्या शेतकऱ्यांची दैन्यावस्था दूर करण्याचे आव्हान पेलावे लागेल.

# गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र फेव्हरेट डेस्टिनेशन!

**महाराष्ट्राने २०२४-२५ मध्ये विक्रमी ₹. १.६५ लाख कोटी परकीय थेट गुंतवणूक आकर्षित केली आहे, जी देशातील एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के आहे. ही ऐतिहासिक कामगिरी स्थिर धोरणे, सक्षम नेतृत्व आणि उत्कृष्ट पायाभूत सुविधांचा परिणाम आहे. राज्यातील औद्योगिक विकास, कुशल मनुष्यबळ आणि प्रगत दळणवळण व्यवस्था गुंतवणूकदारांना आकर्षित करत आहे. या गुंतवणुकीमुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल.**



व्यापार उद्यमात गुंतवणूक हवी असेल, तर आधी पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतात, हे मोदी सरकारचे सूत्र आता सकारात्मक परिणाम दाखवत आहे. देशाच्या आर्थिक नकाशावर आपला ठसा कायम ठेवत महाराष्ट्राने परकीय थेट गुंतवणुकीच्या शर्यतीत पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले आहे. महाराष्ट्रातून उद्योगधंदे परराज्यात चालले आहेत, ही बिनबुडाची कोल्हेकुई परकीय थेट गुंतवणुकीच्या ताज्या आकड्यांनी बंद तर केली आहेच, शिवाय राज्याची नाहक बदनामी करणाऱ्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन टाकत महाराष्ट्र टॉपवरच असल्याचे सिद्ध केले आहे.

जगभरातील उद्योगविश्वाच्या नजरा आकर्षित करणारा हा पराक्रम म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ नाही तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवरील विश्वास, स्थिर धोरणे आणि सक्षम यंत्रणेचा परिपाक आहे. विरोधकांच्या काळात आत्मग्लानी आलेल्या राज्याला पराभूत मानसिकतेतून बाहेर काढत महायुती सरकारने नवी झळाळी प्राप्त करून देण्यासाठी अथक परिश्रम घेतल्यानेच हे साध्य होऊ शकले आहे. राज्याला सुखावणारे हे आकडे पाहताना थोडेसे मागे वळून पाहिल्यास 'मेक इन इंडिया'पासून 'मेक इट इन महाराष्ट्र'पर्यंतचा प्रवास यशस्वी ठरवण्यासाठी कसा भक्कम पाया घातला गेला याचीही नोंद घ्यावी लागेल. या परकीय थेट गुंतवणुकीमुळे राज्याने पुन्हा भारताच्या आर्थिक मांडणीत आपले स्थान भक्कम केले आहे. यातून स्थानिक रोजगार निर्मितीला हातभार लागणार आहे.

महाराष्ट्राने २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक आकर्षित केली. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी तब्बल ४० टक्के आहे, ही तर विशेष कौतुकास्पद बाब. गतवर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आली होती. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले आहे. मागील तपशील पाहिला तर मागील दहा वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतच ओलांडला गेला आहे. म्हणूनच ही ऐतिहासिक आणि विक्रमी गुंतवणूक आहे.

महाराष्ट्राच्या पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कर्नाटकमध्ये ५६,०३० कोटी रुपये थेट परदेशी गुंतवणूक झाली आहे. म्हणजे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य महाराष्ट्राचा निम्मा आकडाही गाठू शकलेले नाही. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत ५१,५४० कोटी, तर गुजरातमध्ये हे प्रमाण ४७,९४७ कोटी आहे. म्हणजेच महाराष्ट्र निर्विवाद आघाडीवर आहे.

परकीय गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे आकर्षित होण्याची अनेक कारणे आहेत. त्या कारणांमुळेच महाराष्ट्र हे भारतातील गुंतवणुकीसाठी एक लोकप्रिय ठिकाण झाले आहे. महाराष्ट्रात औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळ यांसारख्या विविध क्षेत्रांत गुंतवणूक करण्यास अनेक संधी आहेत. महाराष्ट्र हे देशातील असे अग्रेसर औद्योगिक राज्य आहे, ज्याचे राज्याच्या सकल राज्य उत्पादनात १४ टक्क्यांहून अधिक योगदान आहे. मुंबई हे भारतातील सर्वात मोठे आणि आशियातील सर्वात जुने स्टॉक एक्स्चेंजचे (मुंबई रोखे बाजार) ठिकाण आहे. राज्यात चांगले रस्ते, रेल्वे आणि विमानतळ नेटवर्क आहे, ज्यामुळे वाहतूक आणि संपर्क साधणे सोपे होते.

राज्यात विविध उद्योगांसाठी आवश्यक असलेले पाणी, वीज, जमीन आणि जागा उपलब्ध आहे. राज्यात उच्चशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ आहे. गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन आणि अनुदान उपलब्ध आहे. व्यवसायासाठी इथे अनुकूल असे उद्योगस्नेही वातावरण आहे. राज्यात मजबूत कनेक्टिव्हिटी आणि ग्राहकांची भरभक्कम मागणी आहे. महाराष्ट्रामध्ये गुंतवणुकीसाठी अनेक संधी आहेत. औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि इतर फायद्यांमुळे हे राज्य गुंतवणुकीसाठी एक योग्य ठिकाण आहे. त्याचप्रमाणे राज्यात दळणवळणाची साधने विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत.

राज्यातील उत्तम भौगोलिक आणि आर्थिक परिस्थिती, अद्ययावत तंत्रज्ञानाची उपलब्धता पाहता महाराष्ट्र गुंतवणूक करण्यास उत्तम पर्याय आहे. राज्यातील तांत्रिक कुशल मनुष्यबळ मोठ्या संख्येने आहे. तरुण-तरुणींना वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यावर राज्य सरकारने भर दिला आहे. त्यांच्या कौशल्याचा उपयोग महाराष्ट्रात उद्योग उभारू इच्छिणाऱ्या उद्योगांना होत आहे. कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा तसेच महिलांचा विकास आणि परकीय गुंतवणुकीचे क्षेत्र अशा सात पैलूंनी राज्याचा विकास होत असल्याने राज्य हे दिवसेंदिवस उद्योगपूरक होत चालले आहे. या गुंतवणुकीतून उदयास येणारे उद्योग हे केवळ मुंबई-पुणे-नाशिकपुरते मर्यादित न राहता, अन्य प्रांतांमध्येही त्यांचा विस्तार होईल. त्यातून आजवर राहिलेला प्रादेशिक असमतोल दूर करण्यावर सरकारचा भर आहे. परकीय थेट गुंतवणुकीने या सगळ्या प्रक्रियेला अधिक प्रमाणात चालना मिळेल. येत्या काळात आर्थिक विकासाची गंगा सर्वदूर पोहोचून राज्याची भरभराट कायम राहील, यात शंका नाही. त्यामुळे भविष्यात आणखी मोठ्या गुंतवणुकीचे स्वागत करण्यास महाराष्ट्र सज्ज आहे.

# सिंहस्थ राम भरोसे!



तोंडावर आलेल्या नाशिकमधील सिंहस्थ कुंभपर्वातील 'अमृतस्नाना'च्या तारखा खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच जाहीर कराव्या लागल्या. उज्जैनमध्ये २०२८ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या तारखा केव्हाच निश्चित झाल्या, तेथे दोन वर्षांपूर्वीच विकासकामांचा नारळही फुटला; तरीही त्याआधी २०२६-२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होऊ घातलेल्या या जागतिक सोहळ्याच्या तारखांना मुहूर्त लाभत नव्हता. अनेक महिने आरडाओरड सुरू होती.

साधू-महंत आणि खासकरून आखाडा परिषद आगपाखड करीत होती. शेवटी राज्याचे प्रमुख या नात्याने मुख्यमंत्र्यांनाच पुढाकार घ्यावा लागला. आढावा बैठकीदरम्यान सरबराई करूनही साधू-महंत आणि पुरोहित संघात खडाजंगी झालीच. मुख्यमंत्र्यांना स्वतःच तारखा वाचून दाखवाव्या लागल्या. दोन्ही तीर्थक्षेत्रांत शैव-वैष्णवांचे प्रत्येकी तीन याप्रमाणे एकूण सहा वेळा अमृतस्नान होईल. एक अपवाद वगळता दोन्ही ठिकाणच्या पर्वण्या एकाच दिवशी होणार आहेत. गर्दीचे विभाजन होणार असल्याने सरकार, पोलिस आणि इतर यंत्रणांवरील भार जरा हलका होऊ शकेल. मात्र, एकाच वेळी रसद पुरविण्याचे आव्हानही पेलावे लागणार आहे. वरकरणी सिंहस्थाच्या तारखांचा वाद मिटल्याचे दिसत असले, तरी अजूनही अमावास्येला होणाऱ्या पहिल्या पर्वणीच्या तारखेवर दोन आखाड्यांचा आक्षेप कायम आहे. साधूमंडळींनी बैठकीत सिंहस्थाचा उल्लेख 'नाशिक-त्र्यंबकेश्वर' नव्हे, तर त्र्यंबकेश्वर-नाशिक असाच मुख्यमंत्र्यांच्या तोंडून वदवून घेतला. पर्वण्यांचा उल्लेखही शाही नव्हे, तर 'अमृतस्नान' असाच होईल, यावरही कटाक्ष ठेवण्यास भाग पाडले गेले.

जागतिक आकर्षणाचे केंद्र असलेल्या या धर्म-अध्यात्माच्या सोहळ्यासाठीची विकासकामे प्रत्यक्षात केव्हा सुरू होणार, हा खरा प्रश्न आहे. नियोजनाचे गाडे कागदावरून पुढे सरकायला तयार नाही. इतर वेळी किमान चार-पाच वर्षे आधीच कामे सुरू झालेली असत. आता दिल्लीपासून गल्लीपर्यंत 'शत-प्रतिशत भाजप'च आहे. मात्र, तरीही कुंभपर्वाच्या तयारीकडे अक्षम्य दुर्लक्ष होणे अनाकलनीय आहे. आतापर्यंत चोवीस हजार कोटींचे आराखडे सरकारकडे सादर केले गेले. त्यावर बराच काळ खल होऊन काटछाटही झाली. मात्र, लोकानुनयी योजनांवर हजारो कोटींची खैरात करणाऱ्या राज्य वा केंद्राकडून अद्याप तोंडी मान्यतेशिवाय एक रुपयाही मिळालेला नाही. सद्यस्थितीत अनेक निविदा अंतिम टप्प्यात आहेत. सहा हजार कोटींच्या कामांना सुरुवात झाल्याचेही सांगितले जाते. प्रत्यक्षात निविदांतील त्रुटी हा कळीचा मुद्दा आहे.

गोदावरी स्वच्छतेसाठी सोळाशे पन्नास कोटी रुपयांची निविदा निघाली खरी; मात्र विशिष्ट ठेकेदाराच्या भल्यासाठीच ही प्रक्रिया राबविल्याचा आरोप शिंदेंच्या शिवसेनेने केला आहे. साधुग्रामसाठी भूसंपादनाचा प्रश्न सुटू शकलेला नाही. त्यासाठी पाच हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. मलनिस्सारण केंद्रे, रिंग रोड, इतर रस्ते प्रकल्प अशी असंख्य कामे प्रलंबित आहेत. प्रयागराजच्या धर्तीवर सिंहस्थपर्वासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची घोषणाही केली गेली. त्याची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. प्राधिकरणात समावेशासाठी साधू-महंत आक्रमक असल्याने हा तिढाही सोडवावा लागेल. पालकमंत्र्यांवाचून काही अडून राहिले नसल्याचे मुख्यमंत्र्यांचे म्हणणे असले, तरी कामांचे 'रिपोर्टिंग' नेमके कुणाला करावे, याबद्दल अधिकाऱ्यांच्या मनात संभ्रम आहे. सिंहस्थ मेळा मंत्री म्हणून गिरीश महाजन यांची नेमणूक झाली खरी; पण नियोजनात सामावून घेतले जात नसल्याने लोकप्रतिनिधी नाराज आहेत.

श्रद्धा आणि आस्थेचा विषय असलेला हा वैश्विक सोहळा तब्बल २२ महिने चालणार आहे. दहा ते बारा कोटी भाविकांचे आगमन होण्याचा अंदाज आहे; परंतु या पाहुण्यांना सोयी-सुविधा कोण आणि कशा पुरविणार, या प्रश्नावर एकमेकांकडे बोट दाखविले जाणे दुर्दैवी आहे. सुरक्षेचा बाऊ केला गेल्याने मागील कुंभमेळा फसल्याचे सारेच मान्य करतात. रस्त्यांसह पायाभूत सुविधा उभ्या राहिल्या असल्या, तरी ही उलाढाल खालपर्यंत पाझरू शकली नाही. स्थानिक सहभागी झाले नाहीत आणि सुरक्षेच्या अतिरेकामुळे बाहेरील भाविकांनीही पाठ फिरवली. या खेपेला तसे काही घडल्यास ती नामुष्की ठरेल. प्रयागराजचे कुंभपर्व गर्दी व आर्थिक उलाढालीच्या बाबतीत यशस्वी ठरल्याने महाराष्ट्र सरकारवरही दबाव वाढला आहे. राज्याचे 'ब्रँडिंग' करण्याची ही नामी संधी दवडता कामा नये. 'रात्र थोडी, सोंगे फार' अशी परिस्थिती असल्याने कामे सुरू न झाल्यास येणारे कुंभपर्व 'राम भरोसे' आहे, असेच म्हणावे लागेल. गोदावरीचे पाणी स्वच्छ करण्यासाठी आधी निधीची गंगा आणावी लागेल. ती काही काळ वाहती राहिली, तरच दर सिंहस्थ मेळा सुफळ, संपूर्ण होऊ शकेल.

## व्हेज खिमा रोल

**साहित्य:** सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



**कृती:** सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

## नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

**नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.**

**कित्येक** शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.



▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.

## जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे



▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮ बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

## ‘फार्मा सही दाम’ ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

**‘फार्मा सही दाम’ हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.**

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच ‘फार्मा सही दाम’ नावाचे ॲप लाँच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

**ॲप कसे काम करते?**

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पयार्यांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील.

या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून ‘ऑगमेंटिन’ हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

**केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा**

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

## लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

**वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.**

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या



माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.

वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. ‘बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.’ ‘वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,’ असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

## ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता

**शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.**



**कमी** चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.

**लक्षणे :**

**स्नायू कमजोर होतात :** ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या- फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.

**दृष्टी कमी होणे :** ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.



**रक्ताची कमतरता :** अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

**ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?**

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.

## उन्हाळ्यात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...

**उन्हाळ्यात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हाळ्यात बाहेर निघालं की शरीराची अक्षरशः लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हाळ्यात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...**



**जीन्स** अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषूण घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.

उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.



## ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

**अनेक** जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो.

सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.



▮बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.

▮टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.

## केळी खाण्याचे असेही फायदे

**फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळ्यात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळ्यात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळ्याचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळ्याचे जबरदस्त फायदे.**



**केळ्याचा** रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील ‘इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट’ या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.

हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

# ठाणे महापालिकेचा पर्यावरण दिनी संकल्प वर्षभरात दोन लाख झाडे लावणार

**■ठाणे :** ठाणे महानगरपालिकेतर्फे जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'हरित ठाणे अभियाना'त वर्षभरात दोन लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या अभियानाचा औपचारिक शुभारंभ गुरूवार, ०५ जून रोजी होणार आहे. ठाण्यास हरित, पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त बनविण्याच्या दृष्टीने 'उपमुख्यमंत्री हरित ठाणे अभियान' एक ठोस पाऊल ठरणार आहे. त्यामुळे या अभियानात नागरिकांनी पुढाकार घेऊन सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. गतवर्षी महापालिकेने या अभियानात सव्वा लाख झाडे लावली आहेत. या वृक्षारोपण अभियानात, पळस, बेल, नीम, कांचन, सिताअशोक, जांभूळ, पारिजातक, शिसम, कोकम, शिवण, करंज, अडुळसा, तगर, लिंबू, कामिनी, बकूळ, बांबू आदी देशी वृक्षांचा समावेश आहे.



**कालबद्ध कार्यक्रम**

ठाणे आणि परिसरात हरित क्षेत्र वाढवण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबवण्यात येत आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निदेर्शानुसार उपमुख्यमंत्री हरित ठाणे अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या अनुषंगाने आतापर्यंत दोन लाख पाच हजार झाडे लावण्याचे सविस्तर नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी, १८ हजार ५०० झाडे लावण्यात आली आहेत. तर, उर्वरित एक लाख ८६ हजार ५०० झाडे लावण्याचे टप्प्याटप्प्याने कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे.

### वृक्षारोपणात सगळयांचा सहभाग

या अभियानात, ठाण्यात एकूण दोन लाख पाच हजार झाडे लावली जातील. त्यात, मियावाकी पद्धतीने ३० हजार झाडे, विविध विकासकांमार्फत पाच हजार झाडे, खाजगी संस्था, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, निवासी गृहसंकुले आणि शासकीय कार्यालयांच्या सहभागातून पाच हजार झाडे लावण्यात येणार आहेत. तसेच, शेवग्याची १० हजार लावण्यात येणार आहेत. त्यापैकी पाच हजार झाडे लावली आहेत.

### आतकोली येथे बांबूची लागवड

त्याचबरोबर, महापालिकेतर्फे, आतकोली येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प परिसरात बांबू प्रजातींच्या पाच हजार विशेष झाडे लावली जाणार आहेत.

### वन खात्याच्या जागेत झाडे लावणार

प्रादेशिक वन विभागाची जागा व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे महापालिकेतर्फे एकूण एक लाख ३० हजार झाडे लावण्याचे नियोजन आहे. त्यात, स्थानिक प्रजातीची ८० हजार झाडे, तर, बांबू प्रजातीची ५० हजार झाडे लावण्यात येणार आहेत.

### कोलशेत येते मियावाकी वन

कोलशेत एअर फोर्स स्टेशन परिसरात मियावाकी पद्धतीने २०,००० झाडे लावण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. ही झाडे लावण्यासाठी खड्डे खोदणे, खत व माती भराव, सिंचन व्यवस्थापन ही पूर्व तयारीची कामे सध्या प्रगतीपथावर असून प्रत्यक्ष काम सुरू असल्याची माहिती वृक्ष अधिकारी राजेश सोनावणे यांनी दिली. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ठाणे महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत समन्वय साधण्यात येत आहे. या अभियानात, नागरिक, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, गृहसंकुले, शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच संरक्षण क्षेत्रातील विविध संस्था यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येत असल्याचे उपायुक्त मधुकर बोडके यांनी सांगितले.

### गतवर्षी सव्वा लाख झाडे लावली

गेल्या वर्षी या अभियानात ठाणे महापालिकेने एकूण एक लाख २७ हजार झाडे लावली. त्यापैकी, ठाण्यातील सर्व प्रभागांमध्ये ४९ हजार २४४ झाडे लावण्यात आली. नागला बंदर येथे १५०० झाडे मियावाकी पद्धतीने लावण्यात आली. तसेच, महापालिका आणि खाजगी शाळा, महाविद्यालये येथे ५४०० झाडे लावण्यात आली. ठाण्यातील मेट्रो मार्गाखाली तसेच इतरत्र ११ हजार बांबूची झाडे लावण्यात आली. त्याचबरोबर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे ६० हजार झाडे लावण्यात आली. त्यात ४० हजार पारंपरिक पद्धतीने तर, २० हजार झाडे मियावाकी पद्धतीने लावण्यात आल्याची माहिती उद्यान अधिक्षक केदार पाटील यांनी दिली.

# हिंदुत्वाच्या मुद्द्यावर शिंदे-ठाकरे गट एकत्र



**■कल्याण :** राज्यभरात शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गटात संघर्ष पाहायला मिळत असताना, कल्याणमध्ये मात्र ठाकरे गटाचे उपनेते विजय साळवी आणि शिंदे गटाचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांची भेट घेतली. निमित्त होते ते बकरी ईद निमित्त किल्ले दुगार्डीवर घंटानाद आंदोलनाचे. बैठक संपल्यानंतर या दोघांनी देखील आमचे पक्ष जरी वेगळे असले तरी आम्ही हिंदू आहोत आणि हिंदू म्हणूनच राजकीय पक्ष बाजूला सारून आम्ही एकत्रित पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांची भेट घेतल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी किल्ले दुर्गाडी येथे नमाज सुरू असताना दुर्गाडी देवीचे मंदिर देखील खुले असू द्या अशी मागणी पोलीस उपायुक्तांकडे केली.

कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्यावर हिंदू आणि मुस्लीम या दोन्ही समाजाची धार्मिक स्थळे असून दोघांनीही आपले हक्क सांगितले आहेत. बकरी ईद निमित्त दोन धर्मामध्ये कोणतेही वाद होऊ नये यासाठी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी सकाळी मुस्लीम बांधव नमाज पठण करत असताना पोलिसांकडून हिंदु बांधवांना सकाळी दुर्गाडी किल्ल्यावर आरती आणि घंटानाद करण्याकरिता प्रवेश बंदी केली जाते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार ही बंदी झुगारण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली १९८६ सालापासून शिवसेनेने घंटानाद आंदोलन सुरु केले. तेव्हापासून दरवर्षी बकरी ईद निमित्त कल्याण मध्ये शिवसैनिक घंटानाद आंदोलन करतात. शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिवसेना शिंदे आणि शिवसेना ठाकरे गट दोघेही वेगवेगळे आंदोलन करतात. याच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कल्याण परिमंडळ ३चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी शिवसेना शिंदे गट, ठाकरे गटासह हिंदू संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीला शिवसेना शिंदे गटाचे आमदार विश्वनाथ भोईर, ठाकरे गटाचे उपनेते विजय साळवी यांच्यासह दोन्ही गटाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शिवसेना शिंदे गटाचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले की बकरी ईद निमित्त मुस्लिम समाजाचे नागरिक नमाज अदा करत असतात या वेळेला मंदिर प्रवेश बंदी असते. आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ३५ वर्षांपासून या निर्णयाच्या विरोधात शिवसेनेकडून घंटानात आंदोलन सुरू आहे. ईदच्या दिवशी किल्ले दुर्गाडी मंदिरात जाण्यास परवानगी द्यावी अशी मागणी आम्ही केली आहे. हिंदू म्हणून आम्ही एकत्र आलोत आमच्या सोबत इतर हिंदू संघटना देखील आहेत असे, आमदार भोईर यांनी सांगितले. तर ठाकरे गटाचे उपनेते विजय साळवी यांनी देखील आम्ही हिंदू म्हणून एकत्र आलोत. आंदोलन मात्र आमच्या पक्षातर्फेच होईल. आमची मागणी बकरी ईदच्या दिवशी नमाज सुरू असताना मंदिर देखील खुले ठेवण्यात यावे अशीच आहे, असे स्पष्ट केले.

# करवाढ केली, सुविधांचे काय?

**■भिवंडी :** भिवंडी महानगरपालिकेने नुकतेच जललाभ कर आणि मललाभ कर या दोन करामध्ये लक्षणीय वाढ केल्याने शहरातील करदाते नागरिक संतप्त झाले असून नियोजनात्मक नागरी सुविधा देण्यात अपयशी ठरलेल्या पालिकेने नियमित व वेळेत जल आणि मल सुविधा देण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी केली जात आहे. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात अनेक ठिकाणच्या नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा कायदेशीर दाबाने होत नाही. तळमजल्यावर देखील महानगरपालिकेचे पाणी मिळविण्यासाठी विजेची मशीन लावावी लागते. महानगरपालिका क्षेत्रात अनेक जुनी नवी गृहसंकुले असून त्यामध्ये गृहनिर्माण सोसायट्या स्थापन झाल्या आहेत. अशा सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या प्रत्येक सदनिका धारकाकडून मालमत्ता करासोबत जलकर घेतला जात आहे. गेल्या काही वर्षांपासून वेगळा जलकर आकारताना सोसायटीच्या जलवाहिनीच्या जलकर रद्द केलेला नाही. तसेच अनेक ठिकाणी नियमित व सरकारी वेळेनुसार पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. त्याचप्रमाणे ड्रेनेज बाबत वारंवार तक्रार करून देखील ड्रेनेज प्रवाह आणि चेम्बरची दुरुस्ती केली जात नाही.

केंद्र आणि राज्य शासनाकडून मिळालेल्या निधी मधून शहरातील नागरिकांसाठी योजना नुसार काम झाल्याचे अधिकाऱ्यांनी जाहीर




"भिवंडीत जल आणि मल प्रवाहासाठी विविध योजना राबविल्या आहेत. त्या कार्यान्वित होणार आहेत. त्या योजनेनुसार चालणाऱ्या कामकाजासाठी नियमित येणारा खर्च आणि या योजना अद्यावत ठेवण्यासाठी लागणारा खर्च मोठा असून त्यासाठी ही दरवाढ करणे अपेक्षित आहे."

**-संदीप पटनावर, कार्यकारी अभियंता, भिवंडी महापालिका**

केले आहे. मात्र जल आणि मल वाहून नेण्याचे काम सुरु झालेले नाही. शहरातील नागरिकांना योग्य दाबाने पाणी मिळावे यासाठी पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. मात्र या टाक्यांमधून नागरिकांना पाणी वितरित केलेले नाही. तसेच मलनिःस्सारणासाठी भुयारी गटारांची योजना राबविली, मात्र ही योजना अद्याप सुरु झालेली नाही.

नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करदात्या नागरिकांना करावा लागत आहे.भिवंडी महानगरपालिकेचे माजी आयुक्त अजय वैद्य यांनी ११ फेब्रुवारी २०२५ रोजी घेतलेल्या ठरावानुसार पाणीपुरवठा विभागाच्या सूचनेने सध्याच्या प्रशासनाने अलीकडेन जल लाभ कर आणि मल लाभ कर २०-२४-२५ या आर्थिक वर्षांपासून लागू केला आहे. त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांपासून कारयोग्य मूल्याच्या निवासी वापराकरिता १० टक्के व अनिवासी वापराकरिता १५ टक्के जल लाभ कर आकारण्यात आला आहे. तर सर्वप्रकारच्या मालमत्ताना सरसकट ८ टक्के मालमत्ता कर आकारण्यात येणार आहे. याबाबत शहरातील करदात्या मालमत्ता धारकांना ही दरवाढ माहिती होण्याच्या हेतूने महापालिकेतील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. याबाबत दवंडी देखील दिली नाही अथवा हरकती देखील मागविल्या नाही, सध्या महापालिकेत प्रशासन राज्य आहे. त्यामुळे अशी अचानक मनमानीपणे ही दरवाढ केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महापालिकेत अनेक मालमत्ताधारक मालमत्ता कर भरत नाही. त्यामुळे हा वाढलेल्या कराचा भुर्दंड नियमित कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना सहन करावा लागणार आहे.

# धर्माला दिलेले दान ताब्यात घेऊन विकणे चुकीचे : आमदार जितेंद्र आव्हाड

**■भिवंडी :** वक्फ म्हणजे दान आहे. एकदा केलेले दान परत घेता येत नाही. सरकार या कायद्यात सुधारणा करून धमार्साठी दान दिलेल्या जमिनी ताब्यात घेऊन विकणार हे चुकीचे आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे.



वक्फचा सरळ साधा अर्थ आहे. दान धर्मासाठी दान दिलेली जमीन ही सरकारने ताब्यात घेऊन विकणे भारतीय संविधानाच्या विरोधात आहे. दान सर्व धर्मामध्ये होते. हिंदूमध्ये सुद्धा होते. दान केलेली वस्तू ही त्या धर्माची होते. मुस्लिमांवर आज संकट आले आहे. उद्या इतर धर्मावर येणार आहे. बिहारमधील बोधगया येथील बुद्धविहार तेथेही हेच चालू आहे. एखाद्याने धर्मासाठी दान केलेल्या जमिनीचा वापर धमार्साठीच होत आहे का, यावर सरकारने लक्ष ठेवले पाहिजे, त्याचा गैरवापर झाला तर गैरवापर करणाऱ्याला तुरुंगात टाका असे शेवटी जितेंद्र आव्हाड यांनी स्पष्ट केले.

ते रविवारी सायंकाळी उशिरा भिवंडीतील शांतीनगर येथील मैदानात मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड भिवंडी शाखेवतीने आयोजित 'तहफ्फूज ए अवकाफ कॉन्फरन्स'मध्ये बोलत होते. तहफ्फूज ए अवकाफ कमिटी महाराष्ट्र प्रमुख मौलाना महमूद अहमद खान यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या या सभेत मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे राष्ट्रीय प्रवक्ता डॉ सय्यद कासिम रसूल इलियास, खासदार सुरेश म्हात्रे, मालेगावचे आमदार मुफ्ती इस्माईल कासमी, भिवंडी पूर्व आमदार रईस शेख, मुंबई आमदार अमीन पटेल, मौलाना जहीर अब्बास रिजवी, मौलाना अब्दुल जब्बार महीरुल कादरी यांसह असंख्य राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

वक्फ विधेयक लोकसभेत चर्चेवेळी मी अनुपस्थित होतो. त्याबद्दल मी समाजाची माफी सुद्धा मागितली होती. पण आज मी खास या सभेसाठी उपस्थित राहिलो आहे, असे स्पष्ट करीत संयुक्त संसदीय समितीमध्ये मी या विधेयका विरोधात भूमिका मांडली होती. आम्ही या विधेयकाच्या विरोधात आहोत आणि पुढे ही राहू असे प्रतिपादन खासदार सुरेश म्हात्रे यांनी केले. तर उर्दू भाषेतील बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान घराघरात वाचले गेले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार रईस शेख यांनी केले.

# मिरा-भाईंदरमध्ये क्लस्टर योजनेला नागरिकांचा विरोध

**■भाईंदर :** मिरा रोड-भाईंदर शहरात क्लस्टर योजना राबवण्यासाठी दोन वर्षापूर्वी मंजुरी देण्यात आली आहे. परंतु गेल्या दोन वर्षांत ही योजना फक्त कागदावरच आहे. जमिनीवर कोणतेही ठोस काम झालेले नाहीत किंवा बाधित नागरिकांना या योजनेची स्पष्टता झालेली नाही. त्यामुळे क्लस्टर पुनर्विकास योजनेला नागरिकांकडून विरोध केला जात आहे. मिरा-भाईंदर शहरात मोठ्या प्रमाणात मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास होण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यासाठी नागरिकांची यातून सुटका करण्यासाठी क्लस्टर योजना मंजूर केली आहे. मिरा-भाईंदर महापालिकेतील



क्लस्टर पुनर्विकास योजना ३७ विभागामध्ये विभागण्यात आली आहे. यापैकी बरेच भाग जीर्ण इमारती, असुरक्षित निवासी संकुले आणि अव्यवस्थित शहरी रचनेमुळे प्रभावित आहेत.

क्लस्टर योजनेचा उद्देश जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करणे आणि नागरिकांना सुरक्षित आणि आरामदायी घरे उपलब्ध करून देणे हा आहे. परंतु ही योजना ज्या पद्धतीने बनवण्यात आली, त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेक इमारतींमधील रहिवासी या योजनेला विरोध करत आहेत. अनेक रहिवाशांचे म्हणणे आहे की त्यांच्या इमारती संरचनात्मकदृष्ट्या सुरक्षित आहेत. त्यामुळे त्या सक्तीच्या पुनर्विकासाच्या कक्षेत येऊ इच्छित नाहीत. त्यांच्यावर कोणतीही जबरदस्ती करू नये असे रहिवाशी सांगत आहेत. भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी ही योजना रद्द करण्याची जाहीर मागणी केली आहे. जबरदस्तीने अंमलबजावणी केल्यास आंदोलन करण्याचा इशाराही मेहता यांनी दिला आहे. दुसरीकडे, शिवसेनेचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की , जिथे ही योजना होत नसेल नसेल तिथे लहान क्लस्टर तयार करावेत किंवा गरजेनुसार मसुदा आराखडा बदलावा तसेच या योजनेत लवचिकता आणण्याची मागणी केली आहे. मंत्री सरनाईक यांनी स्वतः राज्याच्या मुख्य सचिवांसोबत या मुद्द्यावर बैठक घेतली आहे आणि नागरिकांची भावनिक आणि व्यावहारिक बाजू मांडली आहे. सरनाईक यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, एखाद्याला जबरदस्तीने सहभागी करून घेणे किंवा संरक्षित इमारत पाडणे हा उपाय नाही. या योजनेत लवचिकता असली पाहिजे.

# विरारमधील आठवडी बाजारामुळे नागरिक हैराण



**■विरार :** विरार पश्चिमेकडील ब्रोकलिंज इमारतीच्या समोरील रस्त्यावर राजरोसपणे आठवडी बाजार सुरू झाला आहे. मात्र सुरू झालेल्या या आठवडी बाजारामुळे नागरिक तसेच वाहन - चालक हैराण झाले आहेत. संपूर्ण रस्त्यावर आठवडी बाजार थाटल्यामुळे नागरिकांना वाट शोधून घर गाठावे लागत आहे. वसई -विरार शहरात गेल्या अनेक वर्षापासून मिळेल त्या ठिकाणी आठवडी बाजाराचा व्यवसाय फोफावत चालला आहे. यामुळे शहरातील रस्ते आठवडी बाजार गिळंकृत झाले आहे. यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. एवढ्या मोठ्या प्रमाणात बाजार सुरू असताना पालिकेच्या दफ्तरी केवळ ४ आठवडी आणि २४ दैनंदिन बाजारांना परवानगी आहे. मात्र या अनधिकृत बाजारांतून फेरिवाला माफियांकडून दररोज लाखो रुपयांची वसुली केली जाते. मात्र पालिका कारवाई करत नसल्याने हा त्रास वाढू लागला आहे असे नागरिकांनी बोलताना सांगितले.

# वसई शहरात पाच वर्षांत २८ बोगस डॉक्टर प्रकरणे उघड

**■वसई :** मागील काही वर्षांपासून शहरात बोगस डॉक्टरही सक्रिय होऊ लागले आहेत. जानेवारी २०२० ते मार्च २०२५ या पाच वर्षांच्या कालावधीत सुमारे २८ बोगस डॉक्टरांची प्रकरणे महापालिकेच्या आरोग्य पथकाने उघड करून त्यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे.विविध ठिकाणी वाढती अनधिकृत बांधकामे आणि बैठ्या चाळी अशा दाटीवाटीच्या भागाचा आसरा घेऊन बोगस डॉक्टर आपले दवाखाने थाटत आहेत. दवाखाना चालू करताना महापालिकेच्या आरोग्य विभागाची व महाराष्ट्र मेडिकल काउन्सिलची परवानगी घेणे आवश्यक असते. तसेच त्यामध्ये योग्य प्रशिक्षण घेतलेला डॉक्टर, योग्य ती साधने असणे गरजेचे आहे. मात्र कोणत्याही प्रकारचे नोंदणी आणि परवानगीविना अशा प्रकारचे दवाखाने चालविले जात

**किती बोगस डॉक्टर?**

वसई वेस्ट १, विरार वाय के नगर १, नारंगी २, राजावळी २, धानिव बाग ७, बिलालपाडा १, सातिवली ३, हवाईपाडा १, पेल्हार वनोठापाडा १, बावशेतपाडा १, वाकणपाडा१, चिंचोटी १, वालीव १, संतोष भवन १, अलकापुरी १, मनीचा पाडा १, रिचर्ड कंपाउंड १, नवघर पूर्व १ , अशा भागात आढळून आले असून यात विशेषतः नालासोपायात सर्वाधिक बोगस डॉक्टर आहेत.

असल्याचे समोर येते. या बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी आता वसई- विरार महापालिकेच्या आरोग्य पथकाने मोहीम आखली आहे. या अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी धाडी टाकल्या जात आहेत. जानेवारी २०२० ते मार्च २०२५ या दरम्यान शहरात २८ बोगस डॉक्टर आढळून आले आहेत.यात सर्वाधिक बोगस डॉक्टर हे नालासोपारा पूर्वेच्या भागातून आढळून आले असल्याची माहिती महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने दिली आहे.

# घोडे व्यावसायिकांच्या अरेरावीमुळे पर्यटन धोक्यात
## माथेरानकरांना पोलीस अधीक्षकांकडून न्यायाची अपेक्षा

**■माथेरान :** हिल स्टेशन माथेरानच्या प्रवेशद्वाराजवळ म्हणजेच दस्तुरी नाक्यावरील बेशिस्ती आणि फसवणूक पर्यटनाला मारक ठरत आहे. याकडे स्थानिक पोलीस दुर्लक्ष करत असल्याचा आरोप माथेरानकर करत आहे. मुळात माथेरान हे पर्यटनस्थळ आणि पर्यावरण संवेदनशील ठिकाण आहे. त्यामुळे माथेरानचे अर्थशास्त्र पर्यटनावर अवलंबून आहे. म्हणूनच पर्यटकांची फसवणूक होत असल्याचा मेसेज स्थानिकांच्या जगण्याला मारक ठरणार आहे. यासाठी रायगडच्या नव्या पोलीस



काही महिन्यांपूर्वी सर्वपक्षीय माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समिती स्थापन करून पर्यटकांच्या फसवणुकीला ब्रेक लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.. त्यासाठी बंदची हाक देण्यात आली होती. मात्र, काही दिवसांनंतर परिस्थिती पुन्हा जैसे थे होऊ लागली आहे. दस्तुरी नाक्यावर पोलिसांच्या डोळ्यादेखत आलेल्या पर्यटक वाहनाच्या मागे घोडे व्यावसायिक पुन्हा पळत जाऊ लागले आहेत. काही दिवसांपूर्वी घोड्याच्या वर्दीवरून दोन गटात हाणामारी झाली होती. मात्र कोणतीही कारवाई न करता प्रकरण दडपले होते. त्याच बरोबर मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला राजरोसपणे घोडे उभे केल्यामुळे पर्यटकांना जीव मुठीत घेऊन रस्त्यातून मार्ग काढावा लागत आहे.

प्रमुखांनी माथेरानमध्ये लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने सुरू असलेल्या ई-रिक्षाच्या प्रकल्पाला अडथळा आणण्यासाठी ई-रिक्षांना वाट न देणे, प्रशासनाने नेमून दिलेल्या ई-रिक्षा थांब्यावर मुद्दाम घोडे उभे करणे आणि ई-रिक्षाचालकांशी गैरवर्तन करत हुज्जत घालून शिवीगाळ करणे हे सर्व प्रकार येथील पोलिसांसमोर घडत आहे. असाच प्रकार ४ जून रोजी ई-रिक्षा चालकांसोबत घडल्याने जवळपास एक तास सर्व ई-रिक्षा बंद ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे पर्यटक व स्थानिकांचे रिक्षासाठी रांगेत उभे राहूनही हाल झाले. यावेळी माथेरानमधील स्थानिक नेत्यांनी पोलीस प्रशासनाच्या ही बाब लक्षात आणून देताच त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र, पोलिसांना न जुमानता घोडे त्याच जागेवर बांधून ठेवत पोलिसांशी आणि पत्रकारांशी हुज्जत घालण्याचा प्रकार सुरू होता.



# कचरागाडीवर मद्यधुंद चालक... वाहनातील कचरा रस्त्यावर, अपघाताबाबत भीतीचे वातावरण

**■मुंबई :** बोरिवली येथील गोराई डेपोजवळ मुंबई महापालिकेच्या कचरा संकलन करणाऱ्या गाड्या मद्यधुंद चालकांकडून वेगाने चालवल्या जात आहेत. यामुळे रस्त्यावर गाडीत असलेला कचरा पडत राहतो. परिणामी मागून वेगाने येणारी वाहने रस्त्यावर पडल्यालेल्या कचऱ्यावरून घसरत असल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी या परिसरातून वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मुंबईच्या कानाकोपऱ्यातून मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्यावतीने दररोज कचऱ्याचे संकलन केले जाते. त्यानंतर त्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. बोरिवली पश्चिम येथील गोराई बसडेपोजवळ कचरा संकलन करणारी वाहने वेगाने चालवली जात असल्याचे निदर्शसनास आले आहे.

या ठिकाणी अधिक वेगाने वाहने चालवली जात असल्याने कचरा रस्त्यावर पडल्याचे पाहायला मिळत आहे. तर पडलेल्या कचऱ्यामुळे रस्त्यावरून वाहने घसरत असल्याच्या घटना घडत आहे. यामुळे मंगळवारी स्थानिकांनी पाठलाग करून वेगाने जाणाऱ्या कचरागाडीला पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. यावेळी, कचरा वाहन चालवणारे चालक दारू पिऊन वेगाने गाडी चालवतात आणि त्यांच्याकडे ड्रायव्हिंग लायसन्सही नसल्याची धक्कादायक बाब समोर आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com